MHRG060002842026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५१/२०२६**
(श्रीमती रेवती सदाशिव म्हात्रे वगैरे ०३ विरुद्ध
कोणीही नाही)

## निशाणी क्र.१ वरील आदेश

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २–अ नुसार वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील कै. सदाशिव नामदेव म्हात्रे हे दिनांक १८/०७/२०१८ रोजी मयत झाले. तसेच कै. सदाशिव नामदेव म्हात्रे यांची आई पदीबाई नामदेव म्हात्रे ह्या देखील दिनांक ०१/०१/२०१० रोजी मयत झालेल्या आहेत. सबब कै. सदाशिव नामदेव म्हात्रे यांस अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असून तसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जाच्या कामी जाहिर नोटीस काढण्यात आली. सदरची नोटीस स्थानिक वृत्तपत्र दै. रायगड वृत्तवेधमध्ये दि. ०२/०४/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. ती निशाणी क्र. १४ कडे दाखल आहे. दि. ०२/०४/२०२६ पासून आजपर्यंत या अर्जाला कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. तसेच दि. १३/०४/२०२६ रोजी निशाणी क्र. ८ कडील जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. सदर जाहिरनाम्यास कोणीही हरकत घेतली नाही.

४. प्रस्तुत अर्जाच्या कामी अर्जदार यांनी कै. सदाशिव नामदेव म्हात्रे यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मूळ प्रत निशाणी क्र. १२ कडे दाखल केलेली आहे तर कै. पदीबाई

नामदेव म्हात्रे यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मूळ प्रत निशाणी क्र. १३ कडे दाखल केलेली आहे. अर्जदारांनी आधारकार्डची तसेच रेशनकार्डची व्हेरिफाईड प्रत निशाणी क्र. ४ कडील यादीसोबत दाखल केलेली आहे. अर्जदारांतर्फे पुरावा बंद केल्याबाबतची पुरशीस निशाणी क्र. १५ कडे दाखल करण्यात आलेली आहे.

**५.** अर्जदार क्र. १ यांनी प्रस्तुत अर्जाच्या कामी निशाणी क्र. ११ कडे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अर्जदारांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन कै. सदाशिव नामदेव म्हात्रे यांना अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला कायदेशीर कामाकरिता आवश्यक असल्याने त्यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब, पुरावा पाहता अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याची औपचारिकपणे मान्यता देण्यात येत आहे.

:: **आदेश** ::

**१.** अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२**. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. सदाशिव नामदेव म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ४ यांना औपचारिकपणे वारस घोषीत करून वारस दाखला देण्यात येत आहे.

**३**. वारसाचे प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन कायद्याप्रमाणे अर्जदारांनी योग्य तो मुद्रांक शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

सही/–

**पेण.** **(श्रीमती अ. अ. काळे)**
**दि. २१/०७/२०२६.** दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पेण.